महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ 11 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 254 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091

# अजित पवारांनी मांडला महाराष्ट्राचा अर्थसंकल्प



प्रधानमंत्री मोदींच्या संकल्प सिद्धीला बळ देणारा अर्थसंकल्प

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. 10 :-** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 2047 पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचा संकल्प केला आहे. त्यांच्या संकल्पपूर्तीला बळ देणारा वर्ष 2025-26 चा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सादर केला. 'महाराष्ट्र आता थांबणार नाही..., विकास आता लांबणार नाही...' असे सांगत शेती, शेतीपूरक क्षेत्रं, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास अशा अनेक क्षेत्रांसाठी भरीव तरतूद असलेला, 'विकसित भारत-विकसित महाराष्ट्रा'चे स्वप्न प्रत्यक्षात आणणारा हा अर्थसंकल्प आहे.

> ठाणे ते नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ असा उन्नत मार्ग बांधण्याचे नियोजन असून त्याव्दारे ठाणे, डोंबिवली, कल्याण व अन्य महत्वाची मोठी शहरे आंतरराष्ट्रीय विमानतळाशी सुलभरित्या जोडली जातील.
>
> बाळकुम ते गायमुख या ठाणे किनारी मार्गाची लांबी 13.45 किलोमीटर असून त्याचे सुमारे 3 हजार 364 कोटी रुपये खर्चाचे काम सन 2028 अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

यातून देशांतर्गत, विदेशी गुंतवणूक, रोजगार, स्वयरोजगाराच्या संधी वाढतील. विधानसभा निवडणुकीत राज्यातील मतदारांनी व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरवण्यात अर्थसंकल्प यशस्वी होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचा अकरावा अर्थसंकल्प विधानसभेत सादर करताना व्यक्त केला.उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजमंत्री अजित पवार यांनी वर्ष 2025-26 चा अर्थसंकल्प आज विधानसभेत सादर केला. अर्थसंकल्पीय भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज, स्वराज्यजननी जिजाऊ माँसाहेब, छत्रपती राजर्षि शाहू महाराज, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या महामानवांचे स्मरण

> शेती, शेतीपुरक क्षेत्रं, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यटन,पायाभूत सुविधा, सामाजिक विकास क्षेत्रांसाठी भरीव तरतूद असलेला, 'विकसित भारत-विकसित महाराष्ट्रा'चे स्वप्न प्रत्यक्षात आणणारा अर्थसंकल्प
>
> -उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांची घोषणा

केले. शिखांचे नववे गुरु, श्री गुरु तेगबहादूर यांच्या हौतात्म्याचे हे 350 वे वर्ष आहे. स्वराज्य सौदामिनी महाराणी ताराबाई यांचे हे त्रिशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंतीवर्ष आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जन्मवर्ष आहे. देशातील लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या आपल्या सविधानाला 75 वर्षे पूर्ण झाली आहेत. याचाही कृतज्ञतापूर्वक उल्लेख त्यांनी केला.

राज्यात गुंतवणुकीला पोषक वातावरण असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, औद्योगिक विकासात राज्य सदैव अग्रेसर असून थेट विदेशी गुंतवणूकीच्या बाबतीतही देशात अव्वल आहे. जानेवारी, 2025 मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये राज्य शासनाव्दारे एकूण 63 कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. त्याव्दारे येत्या काळात 15 लाख 72 हजार 654 कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. त्यातून सुमारे 16 लाख रोजगार निर्मिती होईल, असा अंदाज आहे. वस्तू व सेवा कर कायदा लागू होण्यापूर्वी राज्यकर विभागातर्फे राबविण्यात आलेल्या विविध कायद्यांनुसार सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे असलेली थकबाकीची तडजोड करण्याबाबतची अभय योजना उपमुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात जाहीर केली. सदर अभय योजनेचे नाव "महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यानी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, 2025" असे असून या अभय योजनेचा कालावधी प्रस्तावित कायदा लागू झाल्याच्या दिनांकापासून दिनांक ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत असेल.

## ठाण्यात मेट्रो मार्गाचे जाळे

ठाणे वर्तुळाकार मेट्रो मार्ग तसेच पुण्यातील स्वारगेट ते कात्रज विस्तार मार्गिका प्रकल्पास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे.पुणे मेट्रो रेल्वे टप्पा-2 अंतर्गत खडकवासला - स्वारगेट - हडपसर - खराडी आणि नळ स्टॉप - वारजे - माणिकबाग या दोन मार्गिकांचा 9 हजार 897 कोटी रुपये किंमतीचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविला आहे.मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या मेट्रो मार्गाचे काम लवकरच हाती घेण्यात येणार आहे.

## अर्थसंकल्पातील महत्त्वाचे मुद्दे

- महाराष्ट्रात देशी-परदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात, औद्योगिक विकासात राज्य अव्वल
- जानेवारी 2025 मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये महाराष्ट्र सरकारने एकूण 63 कंपन्यांसोबत सामंजस्य करार केले
- भारताच्या एकूण निर्यातीत महाराष्ट्राचं 15.4 टक्के वाटा
- येत्या काळात महाराष्ट्रात 15 लाख 72 हजार 654 कोटी रुपयांची गुंतवणूक होणार
- मुंबई महानगर प्रदेश हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक विकास केंद्र म्हणजेच 'ग्रोथ हब' म्हणून विकसित करण्याचा निर्णय
- हातमाग विणकरांना प्रोत्साहन आणि सुविधा देण्यासाठी नागपूर येथे 'अर्बन हाट केंद्रां'ची स्थापना करण्यात येणार
- रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकडून मायक्रोसॉफ्ट कंपनीमार्फत 10 हजार महिलांना कौशल्य व कृत्रिम बुध्दिमत्ता या विषयाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.
- नवी मुंबई येथे 250 एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर, इनोव्हेशन सिटी, उभारण्यात येणार आहे.
- हवामान बदल आणि समुद्राच्या पातळीत होत असलेल्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या नैसर्गिक आपत्तींपासून बचाव करण्यासाठी महाराष्ट्रातील किनारी जिल्ह्यांमध्ये 8 हजार 400 कोटी रुपये किंमतीचा बाह्यसहाय्यित प्रकल्प राबविण्यात येणार आहे.
- 'राज्याचे "लॉजिस्टिक धोरण-2024' जाहीर : 10 हजार एकराहून अधिक क्षेत्रावर समर्पित लॉजिस्टिक पायाभूत सुविधांचा विकास करणार, यातून 5 लाख प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती होणार आहे
- ज्या तालुक्यांमध्ये बाजार समिती अस्तित्वात नाही, तेथे किमान एक स्वतंत्र बाजार समिती स्थापन करण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यासाठी "एक तालुका - एक बाजार समिती" योजना राबविण्यात येणार आहे.

# सौ.कमलताई किसन कथोरे, विधी महाविद्यालयात 'कमलोत्सव'संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**म्हसा**:सौ कमलताई किसन कथोरे, विधी महाविद्यालय येथे प्रथमच महिला दिनानिमित्त वार्षिक पारितोषिक आणि स्नेहसंमेलन उत्सव संस्कृतीचा पार पडला.दिनांक : 8/3/2024 रोजी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे पोई संचलित सौ कमल ताई किसन कथोरे विधी महाविद्यालय 2023-24 मध्ये सुरु झाले. या वर्षी तेथे न्याय, ज्ञान, संस्कृती, याचा उत्सव पार पडला.

या उत्सवाचे निमित्त साधून विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी महाविद्यालयाकडून विविध स्पर्धांचे आयोजन केले होते, रांगोळी,मेहंदी, पाककला, एकपात्री अभिनय, नृत्य, गायन, फॅशन शो, कविता वाचन, इत्यादी स्पर्धेचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी यामध्ये आपला उत्स्फूर्त प्रतिसाद दाखवला. त्याचबरोबर वर्षभर झालेल्या विविध




स्पर्धांचे वार्षिक पारितोषिक वितरण ही महाविद्यालयामार्फत प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला वाव मिळावा यासाठी जीवनदीप शैक्षणिक संस्था कायम कटिबद्ध असते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे. सर्वेसर्वा अध्यक्ष माननीय रवींद्र घोडविंदे साहेब , संचालक प्रशांत घोडविंदे सर, जीवनदीप शैक्षणिक संस्था, कला, वाणिज्य, विज्ञान, महाविद्यालय म्हसा यांचे प्रभारी प्रचार्य योगेश माळी सर . हे प्रमुख अतिथी म्हणून लाभले.

हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी विधी महाविद्यालय म्हसा च्या प्राचार्या कृष्णा आहेर / अय्यर मॅम, सहाय्यक प्राध्यापक सागर सर, यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले, तसेच कला,वाणिज्य, विज्ञान,महाविद्यालय म्हसा येथील प्राध्यापकांची ही मोलाचे सहकार्य मिळाले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी, ऋग्वेद शेलार, निखिल स्पष्टे, नेहा, अभिषेक या स्वयंसेवकांनी खूप मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, देशमुख जया, अशोक सुंबे , अमोल शेळके , यांनी केले. आभार प्रदर्शन अशोक सुंबे यांनी केले. वंदे मातरम ने या कार्यक्रमाची सांगता झाली.

# माळशेज घाटातील काचेच्या पुलासाठी अर्थसंकल्पात तरतूद

## आमदार किसन कथोरेंच्या प्रयत्नांना यश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : माळशेज घाटातील काचेचा पुल उभारणीस अर्थसंकल्पात तरतूद.आमदार किसन कथोरेंच्या प्रयत्नांना यश.मुंबई राज्याचा अर्थ संकल्प आज विधानसभेत अर्थ मंत्री अजितदादा पाटील यांनी सदर केला.या अर्थ संकल्पात मुरबाड तालुक्यातील माळशेज घाटात काचेचा पूल उभारण्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे.आमदार किसन कथोरे यांच्या पाठपुराव्यास यश आले असून हा काचेचा पूल देश विदेशातील पर्यटकांसाठी पर्वनी ठरणार आहे. राज्याचा अर्थ संकल्प सादर करताना अर्थ मंत्र्यांनी पर्यटण विकासाला चालना देण्यासाठी मुरबाड तालुक्यात माळशेज घाटात काचेचा पूल उभारण्यात येणार असल्याची घोषणा केली आहे. या काचेच्या पुलाच्या उभारणीसाठी स्थानिक आमदार किसन कथोरे हे सातत्याने पाठपुरावा करत होते. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अर्थ मंत्री व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे सातत्याने पत्र व्यवहार करून आवश्यक परवानग्यासाठी बैठका घेऊन या बाबत सतत पाठपुरावा केला आहे. अर्थ संकल्पात हा काचेचा पूलाच्या निर्मितीसाठी स्वतंत्र निधीची तरतूदीची घोषणा केल्यामुळे मुरबाड मतदारसंघातील नागरिकांनमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झालेले आहे.

पर्यटकासाठी मुरबाड तालुका आकर्षण ठरणार. . काचेचा पूल राज्यात कुठेच नाही. मुरबाड मध्ये असा पुल निर्मितीनंतर देश विदेशातील पर्यटक या पुलाच्या पहाणी सह प्रवासासाठी माळशेज घाटाला भेटी देतील त्यामुळे मुरबाड तालुका पर्यटकासाठी आकर्षण ठरणार असल्याची प्रतिक्रिया आमदार किसन कथोरे यांनी दिली.

# कोकण विभागीय अधिस्वीकृती समिती अध्यक्षपदी मनोज जालनावाला यांची नियुक्ती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** - राज्य अधिस्वीकृती समितीच्या दि.०९ मार्च २०२५ रोजी झालेल्या बैठकीत अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदू जोशी यांनी कोकण विभागीय अधिस्वीकृती समितीच्या अध्यक्षपदी पत्रकार मनोज जालनावाला यांची निवड करण्यात येत असल्याचे जाहीर केले. नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयातील विशेष समिती कक्षात ज्येष्ठ पत्रकार यदू जोशी यांच्या अध्यक्षतेखाली माहिती व जनसंपर्क महासंचालनालय कोकण विभागाच्या वतीने या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी राज्याचे वनमंत्री ना. गणेश नाईक, आमदार मंदाताई म्हात्रे, नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, महानगरपालिकेचे शहर अभियंता शिरीष आरदवाड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदू जोशी, समितीचे सचिव तथा संचालक (वृत्त व जनसंपर्क) दयानंद कांबळे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक हेमराज बागूल, छत्रपती संभाजीनगर चे संचालक किशोर गांगुर्डे, नागपूर विभागाचे संचालक डॉ.गणेश मुळे व इतर समिती सदस्य आणि अधिकारी उपस्थित होते.

कोकण विभागीय अध्यक्ष कृती समितीचे यापूर्वीचे अध्यक्ष श्री. श्रीकांत चाळके यांनी वैद्यकीय कारणास्तव त्यांच्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या अध्यक्ष पदासाठी अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष आणि सदस्य यांच्या सर्वानुमते श्री.मनोज जालनावाला यांना कोकण विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष म्हणून जाहीर करण्यात आले.

यावेळी या बैठकीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले राज्याचे वनमंत्री ना.गणेश नाईक यांच्या हस्ते श्री.मनोज जालनावाला यांचा सत्कार करण्यात आला. नवनियुक्त अध्यक्ष श्री. मनोज जालनावाला यांचे संपूर्ण कोंकण विभागातर्फे हार्दिक अभिनंदन करण्यात आले आहे.



# रविंद्र धंगेकरांनी सोडला काँग्रेसचा' हात

## शिवसेना शिंदे गटात करणार प्रवेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्रात काँग्रेसला मोठा धक्का बसला असून पुण्यातील कसबा विधानसभा मतदारसंघातील माजी आमदार रविंद्र धंगेकर यांनी अखेर काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली आहे. गेल्या काही दिवसांपासून ते शिवसेना शिंदे गटात जाणार अशी चर्चा होती. अखेर आज त्यांनी पत्रकार परिषदेत काँग्रेसची साथ सोडल्याचे जाहीर केले आणि शिवसेनेत जाण्यावरही शिक्कामोर्तब केले. पक्ष सोडताना दु:ख होत आहे, शेवटी मीही माणूस आहे, असेही त्यांनी म्हटले. आज संध्याकाळी उपमुख्यमंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख एकनाथ शिंदे यांच्यासोबत बैठक होणार असून त्यानंतर पुढील निर्णय घेतला जाणार आहे असे धंगेकर यांनी जाहीर केले. कोणताही निर्णय घेणे प्रचंड कठीण असते. ज्या पक्षासोबत तुम्ही १०-१२ वर्षे काम करतात, त्याठिकाणी कौटुंबिक नाते निर्माण होत असते. लोकसभेच्या किंवा विधानसभेच्या निवडणुकीतही सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी प्रचंड मोठी ताकद मागे उभी केली होती. पराभव झाला ही बाब वेगळी, पण सर्वांनीच आपल्यावर खूप प्रेम केलं. त्यामुळे पक्ष सोडताना दु:ख होतंय, शेवटी आपण माणूस आहोत. मी माझ्या मतदारांशी चर्चा केली.

कार्यकर्तेही काही दिवसांपासून ऐकत नव्हते. त्यांचं म्हणणं होतं की आता आमची कामं कोण करणार? आणि लोकशाहीमध्ये सत्ता असल्याशिवाय सर्वसामान्यांना आपण न्याय देऊ शकत नाही किंवा कामे करु शकत नाही. अशावेळेस कामानिमित्त एक-दोन वेळेस एकनाथ शिंदेंना भेटलो होतो. उदय सामंत यांच्याशीही बोलत होतो. त्यांनी एकदा आमच्यासोबत काम करा असं सागितलं होतं. नंतर धंगेकर शिवसेनेच्या वाटेवर असल्याच्या बातम्या टीव्ही चॅनलवर आल्या होत्या.

त्यानंतर वर्षानूवर्षे ज्या भागात काम करतोय तिथल्या नागरिकांशी चर्चा केल्यावर असं लक्षात आलं की सत्ता असल्याशिवाय काम होत नाही. मध्यंतरी शिंदेंनी मी काँग्रेसचा आमदार असतानाही काही कामांमध्ये सहकार्य करत मदत केली होती. मी माझ्या मतदारांशी आणि सर्व कार्यकर्त्यांशी चर्चा करत हा निर्णय घेतला आहे, असे धंगेकर यांनी सागितले.

# पडघा टोलनाक्यावर करारापेक्षा अधिक वसूली

## खासदार बाळ्या मामांचा अधिका-यांवर कारवाईचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : मुंबई नाशिक महामार्गावरील पडघा टोलनाक्यावर होणाऱ्या टोल वसूलीविरोधात राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा) यांनी संताप व्यक्त केला. बाळ्या मामा यांच्या कार्यकर्त्यांनी मागील तीन दिवसांत टोल नाक्यावरून होणाऱ्या वाहनांचे सर्वेक्षण केले आहे. या सर्वेक्षणामध्ये आणि टोल वसूलीच्या आकडेवारीमध्ये तफावत आढळल्यास टोल प्रशासन आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली जाईल असा इशारा त्यांनी दिला. तसेच टोलनाक्यावर नियमांचे उल्लंघन होत असून दैनंदिन टोल वसूली



बाबतची दिली जाणारी माहिती खोटी असल्याचा आरोपही त्यांनी केला.

मुंबई नाशिक महामार्गावरून हजारो वाहने वाहतुक करतात. भिवंडीत गोदामे अधिक असल्याने उरण जेएनपीटी आणि गुजरातमधून येणाऱ्या अवजड वाहनांची वाहतुक या मार्गावरून अधिक असते. येथील पडघा टोलनाका आहे. हा टोलनाका बंद व्हावा यासाठी येथील रहिवासी आणि राजकीय पक्षांनी अनेक आंदोलने केली होती. असे असले तरी हा टोलनाका सुरूच आहे. रविवारी रात्री बाळ्या मामा यांनी पडघा टोलनाक्यावर गेले. तसेच त्यांनी येथील टोल प्रशासनाला टोल वसूली बाबत जाब विचारला. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बाळ्या मामा यांनी टोल नाक्यावर नियमांचे पालन होत नसल्याचा आरोप केला. टोलनाक्यावरील वाहतुक कोंडीत मी दोन ते तीन वेळा अडकलो होतो. तेव्हा याबाबत टोल प्रशासनाला नियमांचे पालन करण्याच्या सूचना केल्या होत्या. परंतु टोल प्रशासन कोणत्याही नियमांचे पालन करत नाही. या टोलवरून हलक्या वाहनांना सुट दिलेली नाही. टोलनाक्यामुळे गोदामाच्या माध्यमातून होणारा गावांचा विकास थांबला आहे. शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे असा आरोपही त्यांनी केला. टोल वसूली विषयी अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या टोलनाक्यावर दररोज ३४ लाख रुपयांची टोल वसूली होत असल्याचे येथील अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. परंतु ही माहिती चूकीची आहे. आतापर्यंत टोल करारापेक्षाही अधिकची टोल वसूली येथून झाली आहे. त्यामुळे शुक्रवार, शनिवारी आणि रविवारी टोल नाक्यावरून होणाऱ्या वाहनांच्या वाहतुकीची नोंद आमच्या कार्यकर्त्यांनी केली आहे. यानंतर आम्ही टोल वसूलीमधील तफावत दाखविणार आहोत. हे सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर निष्काळजीपणा आढळल्यास राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली जाईल असा इशारा त्यांनी दिला.



# छत्रपती संभाजी महाराज पुण्यतिथी

## जगाला स्वाभिमानाची प्रेरणा देणारे महाप्रतापी धर्मवीर संभाजी महाराज



छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे इ.स.१६५७ रोजी पुरंदर येथे झाला आणि हिंदवी स्वराज्यात तेजस्वी तारा प्रगट झाला.राजपुत्र असल्यामुळे रणांगणातील मोहीम व राजकारणातील डावपेच यांचा संपूर्ण अभ्यास अवगत होता. त्याचप्रमाणे लहानपणापासूनच ते अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे मोठे धनी होते. संभाजींना लहानपणापासूनच अनेक कठीणायीचा सामना करावा लागला.संभाजी महाराज लहान असतांनाच त्यांच्या आई महाराणी सईबाई यांचे निधन झाले आणि त्यांच्या काळजावर मोठा आघात झाला.या आघातापासुन सावरण्यास राजमाता जिजाबाई यांनी आपले सर्वस्व पणाला लावले आणि हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी व रक्षणासाठी शूरवीर संभाजी नावाचा महामेरू उभा केला. संभाजींची सावत्र आई पुतळाबाई यांनी आपल्या मुलासारखी वागणुक देवुन वटवृक्षाचे काम केले.परंतु त्यांची दुसरी सावत्र आई सोयराबाई यांनी संभाजीराजांच्या रस्त्यात बाभळीचे काटे रोवुन पोरकेपणाची वागणुक दिली व महाराजांच्या राजकीय कारकीर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला. संभाजीच्या मनात लहानपणापासूनच आपण स्वराज्यासाठी काहीतरी केले पाहिजे.या उद्देशाने त्यांनी राजकारणातील संपूर्ण बारकावे आत्मसात केले. मुगलांच्या घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले.त्याचप्रमाणे संस्कृतसह इतर आठ भाषांचे ज्ञान त्यांना अवगत होते.याचा फायदा भविष्यात व्हावा या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले.त्यावेळी संभाजीराजे फक्त ९ वर्षाचे होते.शिवाजी महाराज औरंगजेबाच्या नजरकैदेतुन निसटल्यानंतर त्यांना संभाजींची चिंता वाटू लागली.औरंगजेब आगबबुला झाला अशा वेळी संभाजीराजे स्वराज्यात सुखरूप पोहचावे या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा सर्वत्र पसरवून मोगलांच्या डोळयात धुळ झोकून संभाजींना महाराष्ट्रात सुखरूप पोहचण्याचा मार्ग मोकळा केला.इ.स.१६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर अवघ्या १२ दिवसातच राजमाता जिजाऊंचे निधन झाले आणि पुन्हा संभाजींना मोठा जब्बर धक्का बसला.त्यानंतर त्यांच्याकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही.कारण शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते.छत्रपती संभाजीं महाराजांनी आपल्या वडिलांप्रमाणेच सक्तीने धर्मांतरन करणाऱ्या इंग्रज, पोर्तुगीज व मोगल सत्ताधाऱ्यांचा कडाडून विरोध केला.औरंगजेबाने इ.स.१६८२ साली मराठ्यांवर हल्ला केला.औरंगजेब सैन्य, दारूगोळा, हत्ती-घोडे याबाबतीत बलशाली होता.कारण औरंगजेबाचे सैन्य संभाजीं महाराजांच्या तुलनेत ५ पटीने अधिक होते.त्याकाळी जगातील सर्वात शक्तिशाली सैन्यामध्ये औरंगजेबाचा समावेश होता. तरीही संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी हिमतीने लढा दिला.त्याचप्रमाणे संभाजीं महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याच्या सिद्धी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना जोरदार धडा शिकवला. त्यामुळे संभाजीं महाराजांच्या विरूद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत कोणाचीही झाली नाही. कारण त्याकाळी संभाजीं म्हणजे एक वादळी तुफान होते. त्यामुळेच संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखालील मराठ्यांनी मोठ्या शिताफीने झुंज दिली.इ.स.१६८९ च्या सुरूवातीला संभाजीं महाराजांनी त्यांच्या महत्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणातील संगमेश्वर येथे बोलावले.१ फेब्रुवारी इ.स.१६८९ रोजी संभाजीं महाराज रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने नागोजी माने यांच्या साथीने संगमेश्वरावर हल्ला केला.मराठ्यात आणि शत्रूच्या सैन्यात मोठी चकमक झाली.मराठ्यांचे संख्याबळ कमी असल्याने शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाही.त्यामुळे शत्रूने संभाजीं महाराजांना व त्यांच्या सोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले.अशाही परीस्थितीत महाराजांना वाचविण्याचा प्रयत्न मराठ्यांनी केला.परंतु ते त्यात यशस्वी झाले नाहीत.पहिला प्रयत्न जोत्याजी केसरकर यांनी केला. यानंतर अप्पा शास्त्री यांनी देखील केला.परंतु दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले व संभाजीं महाराज औरंगजेबाच्या तावडीत सापडले. औरंगजेबाच्या तावडीत सापडल्या नंतर औरंगजेबाने महाराजांना इस्लाम धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती केली.परंतु त्यांनी आपल्या धर्माचे पालन करत इस्लाम धर्म स्वीकारण्यास नकार दिला. त्याचप्रमाणे राज्याचा संपूर्ण खजाना आमच्या स्वाधीन करावा अशी अट घातली तेही संभाजीं महाराजांनी मान्य केली नाही. संभाजी राजांचा धीटपणा आणि स्वराज्याच्या प्रती प्रेम पाहून औरंगजेब तिलमिला झाला आणि तेव्हा पासून संभाजीं महाराजांना यातना देण्यास सुरुवात केली.तरीही औरंगजेबाची कोणतीही अट माणन्यास व त्यांच्या सामोरं यत्किंचितही झुकण्यास महाराज तयार नव्हते. संभाजी महाराजांनी औरंगजेबाला खडसावून सांगितले की स्वराज्याच्या रक्षणासाठी व प्रजेच्या हितासाठी कोणतीही तडजोड करणार नाही. यासाठी माझे प्राण गेले तरी चालेल. अशी सिंह गर्जना ऐकताच औरंगजेबाने संभाजीं महाराजांना कठोर यातना देण्यास सुरुवात केली.औरंगजेबाने महाराजांचे डोळे काढले, महाराजांची जीभ कापली, महाराजांवर अतोनात वार करण्यात आले.हे सगळं संभाजीं महाराज ४० दिवस सहन करीत होते. तरीही मराठा साम्राज्यासाठी लढत रहाले. एवढ्या छळाने सुध्दा औरंगजेबाचा आत्मा शांत झाला नाही. शेवटी औरंगजेबाने आपली संपूर्ण क्रूरतेची हद पार केली व ११ मार्च १६८९ रोजी महाराजांचे हात-पाय, आणि त्यांचे सर्व देह शरीरापासून वेगळे करून त्यांची क्रूरतेने हत्या करण्यात आली.शेवटी औरंगजेब हताश होऊन म्हणतो की 'माझ्या पोटी असा शूरवीर, धाडसी पुत्र जन्माला का आला नाही?"याची खंत त्याला मरेपर्यंत सतावत होती.शत्रूला हेवा वाटेल असे महान कार्य संभाजीं महाराजांनी केले व जगाच्या इतिहासात कमी वयात म्हणजे ३२ व्या वर्षी स्वराज्याच्या व प्रजेच्या रक्षणासाठी बलिदान देणारा राजा म्हणून संभाजीं महाराजांसमोर आज सर्वच नतमस्तक होतात. संभाजी महाराजांना बलिदान दिनानिमित्त निमित्त कोटी कोटी प्रणाम. महाराष्ट्र हा शूर वीरांचा व धर्मवीरांचा आहे.याची जान आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्यामुळे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान दिनाचे औचित्य साधून राज्यातील भ्रष्टाचार, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी, आरोग्य , शिक्षण इत्यादी समस्याकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे. यामुळे जनतेला (प्रजेला) सुख-समाधान प्राप्त होईल. कारण आज आपण जो मोकळा श्वास घेतो व हसतो-बागडतो आहोत तो छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुंण्यायीमुळेच. हीबाब आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. महाराष्ट्र ही संतांची, शुर वीरांची, थोर महात्म्यांची व क्रांतीकारकांची पावणभुमि आहे.याची जोपासना आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी करने अत्यंत गरजेचे आहे.धर्मवीरांनी महाराष्ट्र घडवीण्यासाठी बलीदान दिले.परंतु आजचा राजकीय पुढारी गरीब, सर्वसामान्य, शेतकरी यांचे रक्त भ्रष्टाचाराच्या माध्यमातून पीत आहे.याची खंत धर्मवीर संभाजी महाराज, साधुसंत, थोर पुरुष, क्रांतीकारक व आपले पुर्वज यांना अवश्य होत असेल.त्यामुळे कोणत्याही महापुरुषांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे व संभाजीं महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन पुढील वाटचाल व्हायला हवी.यातच आपल्याला धर्मवीर संभाजी महाराज दिसून येईल. आज बदलत्या हवामानामुळे प्रदूषणाच्या विळख्यात संपूर्ण पृथ्वी आहे.तीला वाचविण्यासाठी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून युध्दपातळीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.कारण आज लावलेले वृक्ष शेकडो काळ टिकेल. याच वृक्षांच्या पाणात, फुलात, फळात व जळामुळात संपूर्ण थोर महात्म्याचे व शुरविरांचे दर्शन अवश्य होईल.त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ले सुसज्जित करून पर्यटनासाठी मोकळी करावीत. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण-बाण -शान आहे. त्यामुळे त्यांची जपणूक केलीच पाहिजे. यामुळे नवीन पिढीला संपूर्ण गडकिल्ल्यांचा इतिहास समजण्यास सुलभ जाईल आणि शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचा इतिहास सहज समजूत येईल.कारण याच गडकिल्ल्यात महाराष्ट्राची संपूर्ण खरी संस्कृती दडलेली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त कोटी कोटी प्रणाम व मानाचा मुजरा. हर हर महादेव!

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी,नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९.

## गीतासार



**ज्ञानकर्मसंन्यासयोगः**

अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथापरे । प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायामपरायणाः ॥ ४-२९ ॥
अपरे नियताहाराः प्राणान्प्राणेषु जुह्वति । सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषाः ॥ ४-३० ॥

अन्य काही योगीजन अपानवायूमध्ये प्राणवायूचे हवन करतात. तसेच दुसरे योगी प्राणवायूमध्ये अपानवायूचे हवन करतात. त्याचप्रमाणे इतर कितीतरी नियमित आहार घेणारे प्राणायामाविषयी तत्पर मनुष्य प्राण व अपान यांची गती थांबवून, प्राणांचे प्राणांतच हवन करीत असतात. हे सर्व साधक यज्ञांच्या द्वारे पापांचा नाश करणारे व यज्ञ जाणणारे आहेत.
॥ ४-२९, ४-३० ॥

यज्ञशिष्टामृतभुजो यान्ति ब्रह्म सनातनम् । नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम ॥ ४-३१ ॥

हे कुरुश्रेष्ठ अर्जुना, यज्ञातून शिल्लक राहिलेल्या अमृताचा अनुभव घेणारे योगी सनातन परब्रह्म परमात्म्याला प्राप्त होतात. यज्ञ न करणाऱ्या मनुष्याला हा मनुष्यलोक सुद्धा सुखदायक होत नाही; तर परलोक कसा सुखदायक होईल? ॥ ४-३१ ॥

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे । कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे ॥ ४-३२ ॥

अशा प्रकारे इतरही पुष्कळ प्रकारचे यज्ञ वेदवाणीत विस्ताराने सांगितले गेलेले आहेत. ते सर्व तू मन, इंद्रिये आणि शरीर यांच्या क्रियांनी उत्पन्न होणारे आहेत, असे समज. अशाप्रकारे तत्त्वतः जाणून त्यांचे अनुष्ठान केल्याने तू कर्मबंधनापासून सर्वस्वी मुक्त होशील. ॥ ४-३२ ॥

## रेसिपी

### बटाटा मटार पिनव्हिल्स



साहित्य
मटार - एक वाटी
मध्यम आकाराचे बटाटे - 2 ते 3
मैदा - एक वाटी
हिरव्या मिरच्या - 3 ते 4
हळद - अर्धा टीस्पून
आमचूर पावडर - एक चमचा
ओवा - अर्धा टीस्पून
कुटलेले आले - अर्धा इंच
मीठ - चवीनुसार
तेल - तळण्यासाठी

कृती : प्रथम मटार आणि बटाटे उकडून घ्यावेत. बटाटे मटार एकत्र एका बाऊलमध्ये घेऊन त्यात हिरवी मिरची, लाल मिरची पावडर, आमचूर पावडर, मीठ, हळद, आले घालून कुस्करून घ्यावं.
मैद्यामध्ये ओवा, मीठ थोडं तेल घालून मळून घ्या.नंतर मैद्याची पोळी लाटून घ्यावी.त्यावर बटाटे-मटारचं सारण लावून गुंडाळी करा. अशाप्रकारे सर्व पिठाचे रोल्स करून घ्यावेत.
रोल काही मिनिटांसाठी फ्रिजमध्ये ठेवावे. नंतर रोल कापून त्याच्या चकत्या तयार करून घ्याव्यात. कापलेल्या चकत्या आता मैदा आणि पाण्याच्या मिश्रणात घोळवून घ्या. नंतर त्या भाजून किंवा तळून घ्या.सॉस आणि पुदिना चटणीसोबत हे सर्व्ह करा.

## आदर्श सरपंच पुरस्काराने सरपंच समिता सुरोशी सन्मानित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : महाराष्ट्र राज्य सरपंच सेवा संघामार्फत दिला जाणारा आदर्श सरपंच पुरस्कार आज माऊली संकुल सभागृह, अहिल्यानगर येथे झालेल्या शानदार पुरस्कार वितरण सोहळयामध्ये गृप ग्रामपंचायत ग्रामपंचायत रायते-पिंपळोलीच्या महिला सरपंच समिता सुरोशी यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक आदर्श सरपंच पुरस्कार प्रदान करण्यात आला , काल झालेल्या जागतिक महिला दिनाच्या अनुषंगाने महिलांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर करण्यात आला होता त्याचे आज मोठ्या दिमाखदार सोहळयात वितरण झाले रायते पिंपळोली च्या सरपंचांना हा राज्यस्तरीय पुरस्कार



मिळाल्याबद्दल रायते गावाचे नाव लौकिकात एक मानाचा तुरा पुन्हा रोवला गेला आहे सतत गावाच्या विकासाचा ध्यास घेऊन गावासाठी काहीतरी नवीन योजना नवीन कामे व गावातील नागरिकांचे विविध विषयात जनजागृती करून गाव स्वच्छ सुंदर बनवणे हे निकष लावून हा पुरस्कार दिला जातो रायते गावच्या सरपंचांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच खासदार डॉ.श्रीकांतजी शिंदे , खासदार सुरेश (बाळयामामा) म्हात्रे तसेच आमदार .किसन कथोरे , शिवसेना नेते प्रकाश पाटील तसेच सरपंच सेवा संघाचे अध्यक्ष बाबासाहेब पावसे व गावातील पदाधिकारी नेतेमंडळी व सर्व नागरिकांनी आनंदाने सरपंचाचे अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या सरपंचांनी ही सर्वांचे आभार मानले व अशीच सर्वांची साथ विकास कामात बरोबर असू देण्याचे आवाहन केले व उपसरपंच मयुर सुरोशी, ग्राम विकास अधिकारी. राजाभाऊ सुरवसे, ग्रामपंचायत सदस्य, सदस्या व कर्मचारी यांचेही आभार मानले.

## गुटखा तस्करांवर कारवाई प्रामाणिक पोलिस अधिकाऱ्याचा बळी

**पोलीस उपनिरीक्षक रोठे यांच्यावरील कारवाईच्या विरोधात तरुणांची सह्यांची मोहीम**

**नागरिकांचा संताप**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

झिडके-अंबाडी : भिवंडी तालुक्यातील गणेशपुरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत गुटख्याने भरलेला टेम्पो काही पत्रकारांनी अडवून पोलिसांना कळवले. त्यानंतर घटनास्थळी पोहचत पोलिस उपनिरीक्षक उमेश रोठे यांनी कायद्याच्या अधीन राहून कारवाई केली. मात्र ही कारवाई केल्याने गुटखा तस्करांचे राजकीय गॉड फादर तसेच पोलिस खात्यातील काही लोकांनी उमेश रोठे यांना वेगवेगळ्या पद्धतीने दबावात आणत ही कारवाई रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र कोणत्याही दबावाला न जुमानता रोठे यांनी कारवाई केली, आरोपी अटक केले, आणि तब्बल 22- 25 लाख रुपयांचा गुटखा जमा केला. तपासात अनेक धागे दोरे शोधून या तक्रारीच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या पोलिस उपनिरीक्षक उमेश रोठे यांच्या धाडसी कारवाईचे कौतुक करण्याऐवजी त्यांना मानसिक त्रास देण्यात आला. आणि त्यांच्या कडे असलेल्या रिमांड रिपोर्टचा फोटो घेऊन त्यावर छेडछाड करत डुप्लिकेट रिमांड रिपोर्ट बनवून त्यांच्यावरच खोटा आरोप करत अखेर काल त्यांच्यावर बदलीची कारवाई करून त्यांना मुख्यालयी जमा करण्यात आले. या कारवाईला पोलिसांमधील काही वरिष्ठ अधिकारी समर्थन करून गुटखा माफियांना बळ देण्याचे काम करत आहेत. समाजात अत्यंत कमी प्रमाणात प्रामाणिक माणसे उरली आहेत. त्यातच पोलिस खात्यात बोटावर मोजता येतील एवढेच बेडर अधिकारी आहेत. अशाच एका सामान्य कुटुंबातील होतकरू तरुण अधिकाऱ्यावर अशा पद्धतीने राजकीय दबाव आणून उध्वस्त करण्याचे काम केले आहे. गुटखा माफिया लॉबी ला मदत करणाऱ्या एका आमदाराच्या दबावाखाली पोलिस विभागाच्या वरिष्ठांनी ही कारवाई केल्याने जनतेमध्ये संताप व्यक्त होत असून गणेशपुरी भागातील जागृत तरुण आता याविरोधात आंदोलनाच्या भूमिकेत आहेत. प्रथम उमेश रोठे यांच्या वरील कारवाई विरुद्ध सह्यांची मोहीम राबवली जाणार असून ही कारवाई मागे घेतली नाही तर याबाबत आंदोलन करणार असल्याची भूमिका तरुणाच्या कृती समितीने घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहखाते आहे. असे असताना गुटखा माफिया लॉबीला वरिष्ठ पोलीस अधिकारी एवढे समर्थन देत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. लवकरच याबाबत कृती समिती पत्रकार परिषद घेऊन या गुटखा तस्करीचा तपशील मांडणार असल्याची माहिती कृती समितीने दिली आहे.

## होळी सणानिमित्त कोकणात जादा एसटी बसेस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : कोकणातील चाकरमान्यांचा आवडता सण म्हणजे गणेशोत्सव आणि होळी (शिमगा) यासाठी यानिमित्ताने सर्व मुंबई, ठाणे, पालघर येथील चाकरमानी आपल्या गावी जात असतात. यासाठी एस. आहेत. यावर्षीही एसटी च्या जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत.महामंडळातर्फे१० ते १७ मार्चपर्यंत मुंबई, बोरीवली, ठाणे, नालासोपारा, पालघर, आदि ठिकाणावरून जादा गाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

कोकणासह रायगडातही चाकरमानी गावाकडे येत असल्याने महाड पोलादपूर माणगाव, श्रीवर्धन, मुरुड, म्हसळा, अलिबाग सुधागड, पेण, आदि ठिकाणी जादा गाड्या तसेच परतीच्या प्रवासासाठी जादा गाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. परतीच्या प्रवासासाठी १५व१६ तारखेला नालासोपारा पोलादपूर-ठाणे, महाड-कल्याण, श्रीवर्धन - भांडूप, श्रीवर्धन-नायासोपारा, श्रीवर्धन -मुंबई त्या-त्या आगारातून सोडण्यात येणार आहेत. तसेच महाड, अलिबाग माणगाव येथून विनावाहक व शटल गाड्या सोडण्यात येणार आहेत अशी माहिती एस.टी महामंडळांनी दिली.

## रोजगार प्रशिक्षणासाठी ऑनलाईन नोंदणी

रायगड : सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत जिल्ह्यातील माजी सैनिक, माजी सैनिक पत्नी, माजी सैनिक विधवा व त्यांच्या पाल्यांकरीता अल्पकालावधीचे (150 ते 810 तासांचे) रोजगारा संदर्भात प्रशिक्षण कोर्ससाठी ऑनलाईन नोंदणी करावयाची असून रोजगार प्रशिक्षणाचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त इच्छूक माजी सैनिक, माजी सैनिक पत्नी, माजी सैनिक विधवा व त्यांचे पाल्य यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड-अलिबाग ले.कर्नल राहुल वैजनाथ माने (नि.) यांनी केले आहे. प्रशिक्षणासाठी 135 विविध कोर्सची यादी https://bit.ly/SKILLCOURSES या लिंकवर देण्यात आलेली आहे. इच्छूकांनी दि. 12 मार्च 2025 सायंकाळी 06 वाजेपर्यंत फॉर्म भरणे आवश्यक आहे. फॉर्म भरणा करतेवेळी लाभार्थींनी एकापेक्षा जास्त कोर्सची निवड करण्यात येऊ नये.

## पडघा येथे महिलांसाठी आरोग्य शिबीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा: भिवंडी तालुक्यातील पडघा येथे आयोजीत आरोग्य शिबीरात २२० महीलांची तपासणी करण्यात आली असून यावेळी महीलांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

जागतिक महीला दीन व शिवसेना नेते प्रकाश पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून चिंतामणी हॉस्पिटल व श्री शारदा अँकेडमी यांच्या संयुक्त विद्यमाने शारदा अँकेडमीचे संस्थापक, सल्लागार शशांक तांबोळी व चिंतामणी हॉस्पिटलचे संचालक मयुर



दुबेले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद शाळा येथे तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थीतीत रविवारी आरोग्य शिबीर घेण्यात आले यावेळी समाजसेवीका पुष्पलता पाटील यांच्या हस्ते फीत कापुन शिबीराचे उद्घाटन करण्यात आले यावेळी शिवसेना नेते व जि. पी. पारसीक बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश पाटील, उपतालुकाप्रमुख योगेश पाटील कृषी बाजार समितीचे माजी सभापती विलास पाटील, डॉ. संजय पाटील, स्मिता राणे उपस्थित होते. यावेळी विविध स्तरावर १८० महीलांची तपासणी मोफत चष्मे देण्यात आले तर ४० महीलांची सर्वसाधारण तपासणी करून औषधे देण्यात आली.तर तपासणीसाठी चिंतामणी व अँपेक्स हॉस्पिटलच्या तज्ञ डॉक्टरांची टीम उपस्थीत होती तर हे शिबीर यशस्वी करण्यासाठी श्री शारदा अँकेडमीच्या अध्यक्ष सेजल तांबोळी, उपाध्यक्ष आश्वीनी गायकवाड, चिटणीस मयुरी बिडवी, खजिनदार ममता शेलार, कार्याध्यक्ष उषा आगोणे, सहसचिव तृप्ती गंधे, सदस्य सानीका पारधी, उज्वला जाधव, नितीशा म्हात्रे, चेतना वांळज, टी. ए. पाटील इंग्लिश मिडीयम स्कुलचे मुख्याध्यापक रामचंद्र थोरात यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सारीका पारधी यांनी केले.

## महिलादिनी बंदिवान आईची लेकरांशी झाली भेट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : लहान मुलांचा हाताचा स्पर्श त्यांच्या बंदिवान आईच्या हाताला होताच दोघांच्याही डोळयातून वाहणारे अश्रू मुलांप्रती असलेली माया, आपुलकी, जिव्हाळा यातून आई आणि मुलाचे नाते कल्याण जिल्हा कारागृहात पाहायला मिळाले. कारागृह विभागाचे अपर पोलीस महासंचालक सुहास वारके, विशेष पोलीस महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांच्या प्रेरणेतून कारागृह उपमहानिरीक्षक योगेश देसाई यांच्या



मार्गदर्शनाखाली कल्याण जिल्हा कारागृहात जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला बंद्यांकरिता ‘गळाभेट’ कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी, महिला बंदी व त्यांची मुले भारावून गेली होती.

कारागृहातील महिला बंदांची लहान मुले जी बाहेरील संस्थेत अथवा पालकांजवळ आहेत. अठरा वर्षांखालील १४ मुले व ९ मुली यांच्याकरीता कल्याण जिल्हा कारागृह प्रशासन व टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स प्रयास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी ‘गळाभेट’ कार्यक्रम पार पडला. गेल्या १० वर्षांपासून महाराष्ट्र राज्यातील सर्व कारागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

बंद्यांचे नातेवाइक प्रत्यक्ष भेट घेवून, ई-मुलाखत तथा स्मार्ट फोनच्या माध्यमातून बंद्यांशी संवाद साधतात. मात्र, या कार्यक्रमाद्वारे बंदी व नातेवाईक मुले, नात, नातू समोरासमोर बसून एकमेकांसोबत हितगुज केली. कल्याण जिल्हा कारागृह प्रशासन व प्रयास या संस्थेने महिला बंदांच्या मुलांना प्रशासनामार्फत चॉकलेट, नाश्ता, पोहे तर प्रयास संस्थेने फळे दिली.

*गळाभेट कार्यक्रमामुळे महिला बंद्यांमध्ये एक जगण्याची नवी उमेद निर्माण झाली आहे. कुटुंबात परत जाण्यास, मुलांचा सांभाळ करण्यास सकारात्मक प्रतिसाद त्यांच्या मनामध्ये निर्माण झाला असल्याची प्रतिक्रिया कल्याण जिल्हा कारागृहाचे अधीक्षक पी. जे. जगताप यांनी दिली.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558



# फलाटाच्या पत्र्यावरील कचरा पेटला

## ठाणे स्थानकातील रेल्वे सेवा ठप्प

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - स्थानक परिसरातील फलाट क्रमांक दोन वरील पत्र्यावर असलेल्या पालापाचोळ्याला आणि बाजूला असलेल्या झाडाला सोमवारी आग लागल्याची घटना उघडकीस आली आहे. यामुळे फलाट क्रमांक १ आणि २ वरील रेल्वे गाड्या दहा मिनिटांसाठी बंद ठेवण्यात आल्या होत्या. यामुळे प्रवाशांची फलाटावर काही काळ गर्दी झाली होती.

ठाणे स्थानक मधील फलाट क्रमांक एक आणि दोन हे दोन्ही फलाट एकमेकांना लागूनच आहेत. फलाट क्रमांक १ वरुन मुंबईकडे जाणाऱ्या रेल्वे गाड्या धावतात. तर, दोन वरुन कर्जत – कसाऱ्याकडे जाणाऱ्या रेल्वे गाड्या धावतात. या स्थानकांवरील पत्र्यावर असलेल्या पालापाचोळ्याला आणि बाजूला असलेल्या झाडाला सोमवारी संध्याकाळी ४.१५ वाजताच्या सुमारास आग लागली होती. या घटनेची माहिती मिळताच, घटनास्थळी स्थानक मास्तर, रेल्वे पोलीस कर्मचारी, आपत्ती व्यवस्थान विभागाचे कर्मचारी आणि अग्निशमन दलाचे जवान अग्निशमन वाहनासह उपस्थित होते. या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नाही.

आग लागल्यामुळे फलाट क्रमांक १ वरील आणि २ वरील रेल्वे गाड्या दहा मिनिटांसाठी बंद ठेवण्यात आल्या होत्या. ही आग ४ वाजून ४० मिनिटाच्या सुमारास अग्निशमन दलाच्या जवानांकडून आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी यांच्या मदतीने पूर्णपणे विझविण्यात आली. त्यानंतर,फलाट क्रमांक एक आणि दोन वरची रेल्वेसेवा सुरळीत करण्यात आली.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यालयातील दस्त खोलीला आग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूरः** बदलापुरातील मांजर्ली भागात असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यालयातील दस्त खोलीला आग लागल्याची घटना सोमवारी समोर आली. शॉर्ट सर्किटमुळे ही लागली असण्याची शक्यता व्यक्त केली जाते आहे. मात्र कागदपत्रांचे यापूर्वीच संगणकीय प्रणालीत रूपांतर करण्यात आल्याने कामकाजावर परिणाम होणार नसल्याची माहिती प्राधिकरणाच्या वतीने देण्यात आली आहे.

बदलापूर पश्चिमेतील मांजर्ली भागात बदलापूर कल्याण मार्गावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यालय आहे. या कार्यालयातून संपूर्ण पाणी पुरवठा यंत्रणेचा गाडा हाकला जातो.



सोमवारी सकाळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयातील दस्त खोलीला आग लागली. याबाबत माहिती मिळताच कुळगाव बदलापूर नगर पालिकेच्या मांजर्ली अग्निशमन केंद्राच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत ही आग विझवली.

या आगीत कोणत्याही प्रकारची जीवितहानी वा कुणीही जखमी झालेले नाही. मात्र दस्त खोलीतील कागदपत्रे जळून खाक झाली असल्याची प्राधिकरणाच्या वतीने देण्यात आली आहे.

ज्या खोलीला आग लागली ती कार्यालयाच्या शेवटच्या बाजूला असून त्यामध्ये उपयोगी नसलेल्या जुने दस्तऐवज होते. कोणताही कर्मचारी या खोलीत कार्यरत नव्हता, असे सांगण्यात आले. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सर्व जुन्या दस्तऐवजांची माहिती संगणकीय प्रणालीतही संकलित केल्याने त्याचा कामकाजावर परिणाम होणार नसल्याचेही प्राधिकरणाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# शेकडो एकर शेतजमिनीवर खारफुटीचे आक्रमण

## उरणच्या शेतकऱ्यांवर हातची जमीन गमावण्याची वेळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण :** समुद्र किनाऱ्यावर खारभूमीवर निर्माण करण्यात आलेल्या शेतजमिनीत भरतीचे पाणी शिरल्याने शेकडो एकर क्षेत्रावर खारफुटी उगवली आहे. कांदळवन संरक्षित असल्याने या जमिनीचा शेतकऱ्यांना वापर करता येत नाही. येथील शेतकऱ्यांवर आपल्या मालकीच्या जमिनी गमावण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यांनी खारफुटीचे शेतीवरील वाढते आक्रमण थांबवून शेतीचे संरक्षण करण्याची मागणी केली आहे.

समुद्र किनाऱ्यावर वसलेल्या परिसरात मोठ्या प्रमाणात भात शेती आहे. या शेतीचे समुद्राच्या भरतीच्या पाण्यापासून बचाव करण्यासाठी खाडी आणि समुद्र यांच्यात बांध बांधण्यात आले आहेत. या बांधांच्या सुरक्षेची जबाबदारी अनेक वर्षे शेतकऱ्यांकडे होती. मात्र मागील काही वर्षांपासून ही जबाबदारी खारलँड विभागाकडे आहे. त्यामुळे हे बांध सातत्याने फुटून खारे पाणी शेतीत येऊ लागले आहे. तर दुसरीकडे भरतीचे पाणी पुन्हा समुद्रात जाण्याची नैसर्गिक नाले होते. हे नाले विकासाच्या नावाने मातीचा भराव टाकून बुजविण्यात आले आहेत. परिणामी भरतीचे पाणी परत न जाता शेतीत शिल्लक उरते. त्याच बरोबरीने आलेले. खारफुटीचे बीज शेत जमिनीत रुतून खारफुटी उगवू लागली आहे. न्यायालय आणि वन विभागाच्या नियमामुळे शेती असूनही शेतकऱ्यांना आपल्या हक्कच्या जमिनी गमवाव्या लागत आहेत. यावर शासनाने उपाययोजना करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी धुतुम ग्रामपंचायतीचे माजी सरपंच धनाजी ठाकूर यांनी केली आहे.

**खारफुटी संरक्षित आहे. त्यामुळे भात शेतीत आलेली खारफुटी कायम ठेवावी लागते. ती हटविण्यासाठी न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे. मात्र या खारफुटी परिसरात शेतकऱ्यांनी बचत गट आणि वैयक्तिक जिताडा किंवा खेकडे पालन व्यवसाय सुरू केल्यास कांदळवन प्रतिष्ठानच्या माध्यमातून ९० ते ७० टक्के अनुदान देण्याची तरतूद आहे. ज्यामुळे शेतकरी आपल्या शेतीवर उत्पादन घेऊ शकतात.**

समीर शिंदे,
रायगड जिल्हा
कांदळवन कक्ष



# बुलेट ट्रेनच्या मार्गातील बेकायदा बांधकामांवर कारवाई

## अधिका-यांसह पथकाला धक्काबुक्की

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या मार्गात अडसर ठरत असलेली शीळ परिसरातील तळ अधिक एक मजली बेकायदा इमारतीवर ठाणे महापालिकेने सोमवारी पोलिस बंदोबस्तात हातोडा मारला. या कारवाईला सुरूवातीला विरोध झाला आणि यादरम्यान पालिका तसेच पोलिस अधिकाऱ्यांना धक्काबुक्की झाल्याने काही काळ तणावाचे वातावरण होते. मात्र, पालिकेने विरोध मोडीत काढत इमारतीचे बांधकाम पाडले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा महत्वकांक्षी प्रकल्प म्हणून मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन हा प्रकल्प ओळखला जातो.

ठाणे महापालिका क्षेत्रातील शीळ, डवले, पडले, देसाई, आगासन, बेतवडे आणि म्हातार्डी या गावातून बुलेट ट्रेनचा मार्ग जाणार असून म्हातार्डी येथे बुलेट ट्रेनचे स्थानक उभारले जाणार आहे. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी राष्ट्रीय हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या (एनएचएसआरसीएल) माध्यमातून प्रकल्पासाठी जागा हस्तांतराची प्रक्रिया गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे. यामध्ये महापालिकेच्या मालकीची शिळ भागातील जागा बाधित होणार आहे. त्यास पालिकेने यापुर्वीच हिरवा कंदील दाखविला आहे. या प्रकल्पाच्या कामातील अडथळे दूर करण्याचे काम शासकीय यंत्रणांमार्फत गेल्या काही वर्षांपासून सुरू असतानाच, या प्रकल्पाच्या

**बुलेट ट्रेनच्या मार्गावरील शीळ परिसरात तळ अधिक एक मजली बेकायदा इमारत उभारण्यात आली होती. त्यावर आणखी एक मजला उभारणीचे काम सुरु होते. या इमारतीवर कारवाई होऊ नये म्हणून येथील सदनिकांमध्ये काही नागरिकांनी ठाण मांडले होते. या इमारतीत ते वास्तव्य करीत असल्याचे चित्र उभे करण्यात आले होते, अशी माहिती पालिका सुत्रांनी दिली.**

---------

**कारवाईला सुरुवातीला विरोध झाला आणि त्या दरम्यान धक्काबुक्कीही झाली. परंतु विरोध मोडीत काढत पोलिस बंदोबस्तात इमारतीवर कारवाई करण्यात येत आहे.**

**- मनीष जोशी, उपायुक्त,**
**ठाणे महापालिका**

मार्गावर शीळ येथे बेकायदा इमारत उभारण्यात येत असल्याची बाब पालिकेच्या निदर्शनास आली. या इमारतीचे तळ अधिक एक मजली बांधकाम झाले होते. ६० x २५ मीटर क्षेत्रावर हे बांधकाम करण्यात आले होते. या बांधकामावर सोमवारी सकाळी ठाणे महापालिका उपायुक्त मनीष जोशी आणि महसुल विभागाच्या मंडळ अधिकारी सपना चौरे, नितीन पिंगळे (तलाठी) आणि मुंब्रा मंडळ तलाठी यांच्या माध्यमातून कारवाई सुरू करण्यात आली. या कारवाईला सुरूवातीला विरोध झाला. त्यानंतर विरोध मोडीत काढत ही कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान, पालिका अधिकारी जोशी आणि पोलिस अधिकाऱ्यांना धक्काबुक्की झाल्याचे सुत्रांनी सांगितले.

# शिवसेनेच्या वतीने महिलांना मान्यवरांचे मार्गदर्शन

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महिला सशक्तीकरणाचा संदेश देत जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कल्याण पूर्व शिवसेना शहर शाखेच्या माध्यमातून महिलांना मान्यवरांचे व मनोरंजन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. शिवसेना शहर प्रमुख तथा माजी नगरसेवक निलेश शिंदे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमात उद्योजक विनायक पोटे आणि केडीएमसी महिला व बालकल्याण विभाग समाज विकास अधिकारी प्रशांत गवाणकर यांनी उपस्थित महिलांना उद्योग क्षेत्रातील संधींबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. महिलांनी स्वतःचा व्यवसाय कसा सुरू करावा, कोणते लघुउद्योग फायदेशीर ठरू शकतात, याबाबत उपयुक्त माहिती दिली. महिला सन्मानाचा एक भाग म्हणून हळदी-कुंकू समारंभ आयोजित करण्यात आला, तसेच मनोरंजन कार्यक्रमातून उपस्थित महिलांनी आनंद घेतला.



उपस्थित सर्व माता-भगिनींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि मान्यवरांच्या प्रेरणादायी विचारांमुळे हा कार्यक्रम अधिक अर्थपूर्ण ठरला. स्त्रीशक्तीला प्रोत्साहन देणाऱ्या अशाच उपक्रमांसाठी सदैव कार्यरत राहू अशी ग्वाही शिवसेना शहर प्रमुख निलेश शिंदे यांनी दिली. या कार्यक्रमाला शिवसेना उपनेत्या विजया पोटे, जिल्हा प्रमुख छाया वाघमारे, उपजिल्हासंघटक माधुरी काळे, उपशहरप्रमुख राजवंती मढवी-शेट्टी, माजी नगरसेविका संगीता गायकवाड, सारिका जाधव, शोभा पावशे, उपजिल्हासंघटक राधिका गुप्ते, महिला शहर प्रमुख पुष्पा ठाकरे, माजी सरपंच रीनाताई ढोणे यांसह अनेक महिला पदाधिकारी व कार्यकर्ता मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# कासगाव येथे माजी विद्यार्थी स्नेह मेळावा संपन्न

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** शैक्षणिक वर्ष सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षात अभिनव विद्यामंदिर कासगांव येथे शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा रविवार .ता. ०९ मार्च २०२५ रोजी ठीक सकाळी ११ वाजता अभिनव विद्यामंदिर काजगाव येथे संपन्न झाला. स्नेह मेळावा मेळवा मध्ये जवळपास ५० माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीपप्रज्वलन करून स्वर्गीय विनायक पवार सर स्वर्गीय गुलाब भोई सर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली सदर कार्यक्रमास माजी मुख्याध्यापक विनोद देशमुख, शिक्षक संजय ईसामे, चंद्रकांत गगे, कर्मचारी सुरेश यशवंतराव, अनिल यशवंतराव, पद्माकर हरड, स्वर्गीय गुलाब भोई यांचे चिरंजीव रोहन भोई, मुख्याध्यापिका दीप्ती घोलप उपस्थित होते या कार्यक्रमास सर्व माजी विद्यार्थी व शिक्षक यांनी आपले मनोगत व्यक्त केले अनेक विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला तसेच शिक्षकांनी मार्गदर्शन करताना माजी विद्यार्थ्यांना सांगितले की असेच एकत्र राहून आपली प्रगती करा संकटांना धैर्याने सामोरे जावा तसेच सर्व विद्यार्थ्यांना आशीर्वाद दिले. माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या आवारात फेरफटका मारून जुन्या आठवणी बद्दल चर्चा केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राची पाटील व निलेश चौधरी यांनी केले.

तसेच आभार प्रदर्शनाचा कार्यक्रम प्रशांत भाऊ यशवंतराव यांनी केले तसेच स्नेहसंमेलन मेळावा कार्यक्रमाचे उत्तम रित्या आयोजन केल्याबद्दल सर्व माजी विद्यार्थी व शिक्षक यांनी प्रशांत भाऊ यशवंतराव यांचे कौतुक केले. शाळेसाठी माजी विद्यार्थी यांच्याकडून दहा फॅन दहा ट्यूबलाईट व एक्वा फिल्टर भेट देण्यात आला .तसेच या कार्यक्रमासाठी सुभाष केवारी, गुरुनाथ माळी, योगेश पवार, रमेश पडवळ, विजय पालेकर, सुरेश पवार, विशाल गंभीरराव शालेय समितीचे चेअरमन गुरुनाथ (आबा) यशवंतराव यांनी कार्यक्रम आयोजनासाठी विशेष सहकार्य केले



# निर्जन ठिकाणी आढळला सुटकेस मध्ये महिलेचा मृतदेह

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** पेण तालुक्यातील दूरशेत येथे एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका निर्जन ठिकाणी, आड रस्त्यावर, सुटकेसमध्ये भरून एका अज्ञात महिलेचा मृतदेह टाकण्यात आल्याचे आढळून आले. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

गेल्या काही दिवसांपासून या सुटकेसची उपस्थिती स्थानिकांच्या लक्षात आली होती. मात्र, सुरुवातीला कोणीही तिच्याकडे विशेष लक्ष दिले नाही. नागरिकांना वाटले की कोणीतरी जुनी बॅग फेकून दिली असेल. मात्र, काही दिवसांनंतर बॅगमधून दुर्गंधी येऊ लागल्याने नागरिकांना संशय आला. बॅगमधून येणारा वास सहन न झाल्याने काही नागरिकांनी त्वरित पेण पोलीस स्टेशनशी संपर्क साधला. त्यानंतर, पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि संशयास्पद बॅग उघडून पाहिली. सुटकेसमध्ये एका अज्ञात महिलेचा मृतदेह आढळून आला. या प्रकाराने पोलीसही हादरले.

सोमवार दिनांक 10 मार्च रोजी, पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला आणि पुढील तपासासाठी तो पेण येथील सरकारी उपजिल्हा रुग्णालयात पाठवला. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे कारण स्पष्ट होईल.प्राथमिक तपासात ही हत्या असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस माहिती हाती आलेली नाही. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फूटेज तपासण्यास सुरुवात केली असून, मृत महिलेची ओळख पटवण्याचा प्रयत्न सुरू आहे.या प्रकारामुळे दूरशेत आणि आसपासच्या गावांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. नागरिकांमध्ये या घटनेबद्दल मोठी चर्चा असून, पोलिसांनी आरोपीचा जलद शोध घ्यावा, अशी मागणी केली जात आहे. या घटनेचा अधिक तपास पेण पोलीस स्टेशनकडून सुरू असून, लवकरच या प्रकरणाचा खुलासा होण्याची शक्यता आहे.



# ‘पाणी’ हा जिव्हाळ्याचा विषय त्यावर चर्चा झालीच पाहिजे - बाळकृष्ण काळे

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी:** 9 मार्च 'पाणी' हा सर्वांचा जिव्हाळ्याचा व महत्वाचा विषय आहे. त्यावर चर्चा झाली पाहिजे, जीवनाशी अत्यंत महत्वाचा विषय घेऊन ही परिषद आयोजित केली आहे. मानवाला पाण्याचे फायदे-तोटे माहिती आहे. परंतु या परीसंवादातून बारीक गोष्टी माहिती व्हावे हा उद्देश आहे. अण्णानी 45 वर्षांपूर्वी स्वप्न पाहिले होते. कोणी शिक्षणापासून वंचित राहू नये, आमची संस्था ही शिक्षणापासून वंचित राहिलेले जे घटक आहे त्यांच्यासाठी काम करते. असे प्रतिपादन पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष बाळकृष्ण काळे यांनी केले.

पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळाचे बी. एन. एन. महाविद्यालयात 8 मार्च रोजी पाण्यावर संस्थाध्यक्ष डॉ. विजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली व आय.क्यू ए.सी. च्या वतीने आंतरराष्ट्रीय परिषद घेण्यात आली. या परिषदेच्या अध्यक्षीय समारोपात ते बोलत होते.

या परिषदेचे उद्घाटन लेखक तथा मानसशास्त्रीय शल्यचिकित्सक बाजीराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. पाण्या शिवाय मासे जगू शकत नाही, मग माणूस कसा जगू शकतो. आपल्याला पाण्याचे महत्व कळले पण ते वळत नाही असे मत पाटील यांनी उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

या परिषदेचे समारोप राजस्थान विद्यापीठाचे माजी कुलगुरू अरुण सावंत व मुंबई विद्यापीठाच्या इंग्लिश विभागाचे प्रमुख सचिन लबडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. अरुण सावंत व सचिन लबडे यांनी 'पाणी' या महत्वाच्या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केल्याबदल महाविद्यालयाचे कौतुक केले.

या परिषदेला पंतप्रधान कार्यालयाच्या वैज्ञानिक सल्लागार डॉ. केतकी बापट, आय.ए. एस. अधिकारी बलबीर बडालिया, डॉ. सविता कुसुमार, डॉ. अरविंद उबाळे, प्राचार्य डॉ. अशोक वाघ, आय.क्यू ए.सी. समन्वयक डॉ. शशिकांत म्हाळुंकर, उप प्राचार्य डॉ. सुधीर निकम, डॉ. सुरेश भदरगे, डॉ. निनाद जाधव, प्रबंधक नरेश शिरसाळे यांच्यासह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या परिषदेत विविध देशातील व राज्यातील 513 संशोधकांनी पाण्यावर आपले शोध निबंधाचे सादरीकरण केले. ही परिषद यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाच्या सर्व प्राद्यापक व कर्मचाऱ्यानी परिश्रम घेतले.

# अर्थसंकल्पात पर्यटन विभागाच्या पायाभूत सोयीसुविधांसाठी भरीव तरतूद

## - पर्यटन मंत्री शंभूराज देसाई

**मुंबई :** ऐतिहासिक वारसा, संस्कृती आणि विविधता यांनी समृद्ध असलेले राज्याचे पर्यटन क्षेत्र जागतिक पातळीवर पसंतीला उतरत असून आर्थिक विकासाला या क्षेत्रामुळे मोठी चालना मिळत आहे. रोजगाराभिमुख विकासाची या क्षेत्राची क्षमता लक्षात घेऊन २०२५ - २६ च्या अर्थसंकल्पात पर्यटन विभागाच्या पायाभूत सुविधा सोयीसुविधांसाठी भरीव अशी २ हजार ८३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, असे पर्यटन, खनीकर्म व माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले.

पुढील दहा वर्षात एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, आरोग्य पर्यटन धोरणही आखण्यात आले आहे. शिवाय नव्या पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रमाचा इतिहास कळावा यासाठी शिवसृष्टीसारखे विविध प्रकल्प हाती घेऊन त्यासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. सिंधुदुर्ग आणि सातारा जिल्ह्यातील जल पर्यटनासाठी निधीलाही मान्यता देण्यात आली आहे. ठाणे आणि कोयनानगर येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्कायवॉक उभारणीलाही मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे हा अर्थसंकल्प खऱ्या अर्थाने सर्व विभागांना समान न्याय देणारा आहे असे पर्यटन मंत्री श्री.देसाई म्हणाले.

# दुकानदारांची फसवणूक करणारी दुकली गजाआड

**कल्याण :** बनावट फोन पे ॲपवर पैसे पाठवल्याचे दाखवून किराणा दुकानदारांना गंडा घालणाऱ्या दोघांना कोळसेवाडी पोलीसांनी अटक केली आहे.

कोळसेवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत 26 फेब्रुवारी रोजी दुपारी कल्याण पूर्वेतील तिसगांव नाका येथील आर. के. बझार या सुपर मार्केटमध्ये दोन इसम येवुन त्यांनी फिर्यादी यांच्या सुपर मार्केट मधुन किराणा सामान मधील ६२९३/- रू. किमंतीच्या वस्तु विकत घेतल्या. फिर्यादी यांच्या भावाला ऑनलाईन बिल भरतो असे सांगुन त्यांनी हे बिल अदा केल्याबाबत बनावट फोन पे ॲपवर दाखवुन बिल पेड न करता फिर्यादी यांची फसवणुक केली. याबाबत विशाल बोडके यांच्या फिर्यादीनुसार कोळसेवाडी पोलीसांनी गुन्हा दाखल करत तपास सुरू केला.

या दाखल गुन्हयाचा कोळसेवाडी पोलीस स्टेशनचे वपोनि गणेश न्हायदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनिरी सिराज शेख व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि दर्शन पाटील व त्यांच्या पथकाने गुन्हयाचा तांत्रिक तपास करून या गुन्हयातील फसवणुक करून गेलेले आरोपी पंकज पाटील, वय २२ वर्षे, व अनिल कांबळे, वय २४ वर्षे, दोघेही राहणार ठाणे या दोन आरोपीना अटक केली. त्यांच्याकडे सखोल तपास करून कोळसेवाडी पोलीसस्टेशन व मानपाडा पो.स्टे. येथे दाखल गुन्हयातील मुदद्देमाल जप्त करून दोन गुन्हे उघडकीस आणले आहेत. आरोपींच्या ताब्यातुन एकुण १६ हजार ४५५ रू. किमंतीचा किराणा माल वस्तु व एकुण चार मोबाईल फोन असा मुदद्देमाल जप्त केला आहे.हि कारवाई पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे व सहा. पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांच्या मार्गदर्शनाखाली कोळसेवाडी पोलीस स्टेशनचे वपोनिरी. गणेश न्हायदे, पो.निरी प्रशासन नाईक यांच्या सूचनेप्रमाणे सहा. पो निरी दर्शन पाटील, पोलीस उप निरीक्षक सिराज शेख, पोहवा बोरसे, सांगळे, कापडी, जरग, सांगळे, पोशि सोनावळे, गिते यांच्या पथकाने केली आहे.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# ई-चलनाद्वारे दंडात्मक रकमेचा भरणा आता ऑनलाईन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे कार्यालयाद्वारे दि.08 मार्च 2025 पासून एआय तंत्रज्ञानाचा वापर करून मोटार वाहन थकीत कर असलेल्या वाहनांच्या मालकांना व वाहन तपासणीमध्ये दोषी आढळून आलेल्या ई-चलानद्वारे दंडात्मक रकमेचा भरणा प्रलंबित असलेल्या वाहन मालकांना एआय रिकव्हरी असिसटंस (AI Recovery Assistance) द्वारे त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर कॉल करून parivartan.gov.in या संकेतस्थळावरून ऑनलाईन पद्धतीने भरणा करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. तसेच याद्वारे वाहनांची कागदपत्रे जसे की, इन्शुरन्स, फिटनेस, पी यु सी, यांची वैधता समाप्त झालेल्या वाहन मालकांना देखील वाहनांची कागदपत्रे वैध करण्याबाबत अवगत केले जात आहे. वाहन मालकांनी कर व दंड भरण्यासाठी आवश्यकता भासल्यास प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे कार्यालयास संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## संक्षिप्त

### भारताच्या विजयाचा दुबईत जल्लोष



• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : भारतीय क्रिकेट संघाने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकत संपूर्ण देशाला अभिमानास्पद क्षण दिला. या ऐतिहासिक विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी श्रीमंत ढोल ताशा पथकाने दुबईतील स्टेडियमबाहेर दमदार वादन करत क्रिकेटप्रेमींच्या उत्साहात अधिक रंग भरले.भारताच्या विजयाने भारावलेल्या हजारो चाहत्यांनी श्रीमंत ढोल ताशा पथकाच्या जोशपूर्ण वादनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ढोल-ताशांच्या गजरात आणि जल्लोषात संपूर्ण परिसर भारतमय झाला. उपस्थित क्रिकेट चाहत्यांनी आनंदाने नृत्य केले, झेंडे फडकवत भारताचा विजय मोठ्या जल्लोषात साजरा केला. या सोहळ्याने उपस्थित प्रत्येकाचा हृदयस्पर्श केला. अनेक माध्यम प्रतिनिधींनी आणि सोशल मीडियावरील चाहत्यांनी या अनोख्या सेलिब्रेशनचे फोटो व व्हिडिओ शेअर केले, जे प्रचंड व्हायरल होत आहेत.श्रीमंत ढोल ताशा पथक हे केवळ एक वादन पथक नसून, भारतीय संस्कृतीचा जागतिक स्तरावर गौरवशाली प्रचार करत आहे. भविष्यातही अशा ऐतिहासिक क्षणांचे साक्षीदार होत, भारताचा अभिमान वाढवण्याचा पथकाचा संकल्प आहे.

### फोर्टिस हॉस्पिटलकडून कर्करोग जागरूकता



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : फोर्टिस हॉस्पिटल कल्याणने वेस्टर्न इंडिया रीजनल कौन्सिल (डब्ल्यूआयआरसी)च्या कल्याण-डोंबिवली शाखेसोबत सहयोगाने महिला चार्टर्ड अकाउंटंट्ससाठी स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयाच्या ग्रीवेच्या कर्करोगाविषयी जागरूकता सत्राचे आयोजन केले. या सत्राचा या कर्करोगांना प्रतिबंध करण्यासाठी आणि उपचारांचे परिणाम सुधारण्यासाठी नियमित तपासणी व लवकर निदानाचे महत्त्व निदर्शनास आणण्याचा मनसुबा होता. या सत्रात १२० सहभागींनी सहभाग घेतला, जेथे फोर्टिस हॉस्पिटल कल्याणचे असोसिएट सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. हर्षित शाह यांनी या महिलांच्या आरोग्याबाबत चर्चा केली.

या उपक्रमाबाबत मत व्यक्त करत फोर्टिस हॉस्पिटल कल्याणचे फॅसिलिटी डायरेक्टर मोहित वानखडे म्हणाले, “महिलांचे आरोग्य आणि स्वास्थ्याला प्राधान्य दिले पाहिजे, तरीही अनेक महिला त्यांच्या व्यस्त वेळापत्रकामुळे नियमित तपासणीकडे दुर्लक्ष करतात. स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयाच्या ग्रीवेच्या कर्करोगासारख्या आजारांना प्रतिबंध व वेळेवर व्यवस्थापन करण्यात लवकर तपासणी महत्त्वाची भूमिका बजावते. फोर्टिस हॉस्पिटल कल्याणमध्ये आम्ही प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला प्रेरित करण्याप्रती समर्पित आहोत, तसेच महिलांना आरोग्यदायी भविष्यासाठी योग्य माहिती आणि वैद्यकीय सहाय्य उपलब्ध असण्याची खात्री घेत आहोत”

## जीवनदीप कॉलेजच्या मागणीमुळे

# कल्याण-मुरबाड बससेवेच्या फेऱ्यांमध्ये वाढ

• दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : कल्याण बससेवेच्या अपुऱ्या फेऱ्यांमुळे विद्यार्थी, कर्मचारी आणि प्रवाशांचे होणारे हाल लक्षात घेऊन, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाचे जिल्हाध्यक्ष श्रीकृष्णकांत मधुकर मलिक यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. राज्य परिवहन ठाणे विभागाचे नियंत्रक पळसुले यांच्याशी पत्रव्यवहार आणि भेटी घेऊन, त्यांनी या मार्गावर जादा फेऱ्या सुरू करण्याची मागणी केली होती. त्यांच्या मागणीला प्रतिसाद देत, विभाग नियंत्रकांनी कल्याण-मुरबाड मार्गावर पूर्वीच्या २० फेऱ्यांमध्ये १९ फेऱ्यांची वाढ केली आहे. तसेच, कल्याण-मुरबाड-पनवेल मार्गावरील सात फेऱ्यांच्या मार्गात बदल करून, त्या मुरबाड मार्गे सुरू केल्या आहेत. यामुळे एकूण १९ फेऱ्यांची वाढ झाली आहे. या निर्णयामुळे, विद्यार्थी, कर्मचारी आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. पूर्वी अपुऱ्या बससेवेमुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. आता बससेवेतील वाढीमुळे प्रवासाचा वेळ वाचणार असून, प्रवाशांना आरामदायी प्रवास करता येणार आहे. श्रीकृष्णकांत मलिक यांच्या प्रयत्नांमुळे प्रवाशांना दिलासा मिळाला असून, त्यांच्या कार्याबद्दल



## १९ फेऱ्या वाढल्या प्रवाशांना मोठा दिलासा

प्रवाशांकडून त्यांचे आभार मानले जात आहेत.

मुरबाड-कल्याण बससेवेतील प्रवाशांच्या अडचणींना अखेर पूर्णविराम, श्रीकृष्णकांत मलिक यांच्या प्रयत्नांना मोठे यश; १९ फेऱ्यांची वाढ आणि मुरबाड आगारासाठी नवीन बसची मागणी मान्य!

मुरबाड-कल्याण बससेवेच्या अपुऱ्या फेऱ्यांमुळे विद्यार्थी, कर्मचारी आणि सर्वसामान्य प्रवाशांना गेल्या अनेक दिवसांपासून होत असलेल्या त्रासाला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाचे जिल्हाध्यक्ष

> मुरबाड कल्याण महामार्गावर यापूर्वी वीस बसेस धावत होत्या आता नव्याने १९ बसेस ची वाढ झाल्याने आता एकूण ३९ बसेस कल्याण मुरबाड महामार्ग धावत आहेत. मुरबाड कल्याण महामार्गावर धावणाऱ्या बसेसला प्रवाशांकडून चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळत आहे.
> – योगेश मुसळे,मुरबाड बसआगार प्रमुख

श्रीकृष्णकांत मलिक यांच्या अथक प्रयत्नांना मोठे यश मिळाले असून, राज्य परिवहन ठाणे विभागाने कल्याण-मुरबाड मार्गावर तब्बल १९ जादा फेऱ्या सुरू केल्या आहेत. तसेच, मुरबाड आगारासाठी नवीन बस उपलब्ध करून देण्याची मलिक यांची मागणीही मान्य करण्यात आली आहे. मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भागातून कल्याण, मुंबई आणि इतर शहरांमध्ये दररोज हजारो विद्यार्थी, कर्मचारी आणि नागरिक प्रवास करतात. मात्र, या मार्गावर राज्य परिवहनच्या बससेवेची अपुरी संख्या आणि मुदत संपलेल्या प्रवासी जीप बंद झाल्यामुळे प्रवाशांचे मोठे हाल होत होते. विशेषतः विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना वेळेवर बस न मिळाल्याने त्यांच्या शैक्षणिक आणि

> ‘प्रवाशांच्या समस्या सोडवण्यासाठी मी प्रयत्न करत होतो आणि आज मला आनंद आहे की, माझ्या प्रयत्नांना यश मिळाले. राज्य परिवहन ठाणे विभागाने प्रवाशांच्या गरजा लक्षात घेऊन तातडीने निर्णय घेतला, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. या निर्णयामुळे विद्यार्थी, कर्मचारी आणि सर्वसामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल. भविष्यातही प्रवाशांच्या समस्या सोडवण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन.’ – कृष्णकांत मलिक, प्राथमिक विभागाचे ठाणे जिल्हाध्यक्ष,महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद

व्यावसायिक जीवनावर मोठा परिणाम होत होता. या गंभीर समस्येची दखल घेत, श्रीकृष्णकांत मलिक यांनी तात्काळ पावले उचलली. त्यांनी राज्य परिवहन ठाणे विभागाचे नियंत्रक पळसुले साहेब आणि मुरबाड आगार प्रमुख यांच्याशी अनेक वेळा पत्रव्यवहार केला आणि प्रत्यक्ष भेटी घेऊन प्रवाशांच्या अडचणी मांडल्या. त्यांनी कल्याण-मुरबाड मार्गावर जादा फेऱ्या सुरू करण्याची आणि मुरबाड आगारासाठी नवीन बस उपलब्ध करून देण्याची मागणी लावून धरली. मलिक यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना अखेर यश आले. राज्य परिवहन ठाणे विभागाने कल्याण-मुरबाड मार्गावर पूर्वीच्या २० फेऱ्यांमध्ये १९ फेऱ्यांची वाढ केली आहे. तसेच, कल्याण-मुरबाड-पनवेल मार्गावरील सात फेऱ्यांच्या मार्गात बदल करून, त्या मुरबाड मार्गे सुरू केल्या आहेत. यामुळे एकूण १९ फेऱ्यांची वाढ झाली आहे. यासोबतच, मुरबाड आगारासाठी नवीन बस उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे. या निर्णयामुळे मुरबाड तालुक्यातील विद्यार्थी, कर्मचारी आणि सर्वसामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. पूर्वी अपुऱ्या बससेवेमुळे प्रवाशांना तासन् तास बसची वाट पाहावी लागत होती, तसेच गर्दीमुळे त्यांना उभ्याने प्रवास करावा लागत होता. आता बससेवेतील वाढीमुळे प्रवाशांचा वेळ वाचणार असून, त्यांना आरामदायी प्रवास करता येणार आहे.. कृष्णकांत मलिक यांच्या या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल मुरबाड तालुक्यातील प्रवाशांनी त्यांचे विशेष आभार मानले आहेत. मलिक यांनी प्रवाशांच्या समस्या सोडवण्यासाठी घेतलेल्या मेहनतीचे आणि सातत्याचे कौतुक सर्वत्र होत आहे.

# मोंहडुळ ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी जया पारधी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या व लोकनियुक्त सरपंचासहीत ११ सदस्यसंख्या असलेल्या मोंहडुळ गृप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी श्रमजीवी संघटनेच्या जया पारधी यांची बिनविरोध निवड करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

मावळत्या उपसरपंच साक्षी पारेकर यांच्यावरील अविश्वास ठराव मंजूर झाल्याने ही जागा रिक्त होती त्यानुसार सरपंच महेश शाम आगीवले यांच्या अध्यक्षतेखाली एक खास सभा ग्रामपंचायत कार्यालयात सोमवारी घेण्यात आली यावेळी जया केशव पारधी यांचा उपसरपंच पदासाठी एकमेव अर्ज आल्याने त्यांची उपसरपंच पदावर बिनविरोध निवड झाल्याचे घोषित करण्यात आले.यावेळी ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.तर निवडणूक दरम्यान सचीव म्हणुन ग्रामपंचायत अधीकारी डी. डी. राठोड यांनी काम पाहिले. जया पारधी या श्रमजीवी संघटनेच्या ठाणे जिल्हा उपाध्यक्ष असुन त्यांची मोंहडुळ ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदावर निवड झाल्याचे समजतात श्रमजीवी संघटनेच्या पदाधिकाऱ्यासंह ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी, नागरीकांनी त्यांचे अभिनंदन केले.

# खंबाळपाडयात संघाच्या शाखेवर दगडफेक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : खंबाळपाडा परिसरात चौधरी वाडी मैदानात भरत असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) शाखेवर काही अज्ञात व्यक्तींनी दगडफेक केल्याची घटना घडली आहे. रविवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली असून यामध्ये कोणालाही दुखापत झालेली नाही. मात्र घटनेचे गांभीर्य पाहता पोलिसांनी या



घटनेचा तपास सुरू केला आहे. खंबाळपाडा येथील चौधरी वाडी मैदानामध्ये आरएसएसची ही "वीर सावरकर शाखा" गेल्या

## कोणालाही दुखापत नाही

## पोलिसांचा तपास सुरू

काही महिन्यांपासून भरत आहे. याठिकाणी शाखा अध्यक्ष संजू चौधरी आणि शिक्षक पवन कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली लहान मुलांना प्रशिक्षण दिले जाते. दररोज सायंकाळी ७ ते ९ या वेळेत या मैदानावर बालसंस्कार शिबिर आयोजित केले जाते. ज्याठिकाणी मुलांना विविध खेळ आणि शारीरिक प्रशिक्षण दिले जाते.रविवारी रात्री या शाखेत नेहमीप्रमाणे मुलांचे सराव सत्र सुरू असताना अचानक मैदानात दगड येऊन पडण्यास सुरुवात झाली. अचानक घडलेल्या त्यामुळे काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. परंतू यामध्ये सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नाही. दरम्यान या सर्व घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, टिळकनगर पोलीस ठाण्यात याप्रकरणी अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनीही याप्रकरणी आरोपींचा शोध सुरू केला आहे. तसेच या घटनेच्या पार्श्वभूमीवर टिळकनगर पोलिसांनी परिसरात अतिरिक्त बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# ‘डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार’ योजनेसाठी मुदतवाढ

ठाणे : महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील जे विद्यार्थी शासकीय वसतिगृह प्रवेशास पात्र असून शासकीय वसतीगृहात प्रवेश मिळाला नाही, अशा विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी रक्कम संबंधीत विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट वितरीत करण्यासाठी शासनाने "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार" योजना सुरू केलेली आहे.

या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर भरण्यासाठी अर्ज भरण्यासाठी दि.15 मार्च 2025 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज दि.15 मार्च 2025 या मुदतीच्या अगोदर सादर करावेत तसेच अर्ज केल्यानंतर अर्जाची प्रिंट सर्व कागदपत्रांसह सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सामाजिक न्याय भवन, 4 था मजला, दत्तवाडी, खारेगाव, कळवा, जि. ठाणे - 400605 या कार्यालयास जमा करावी, असे आवाहन ठाणे समाज कल्याणचे सहायक आयुक्त समाधान इंगळे यांनी केले आहे.

# धर्मवीर आनंद दिघे हायस्कूल ग्रंथालय सभागृहाचे उद्घाटन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद: इपीएल लिमिटेड या कंपनीच्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या धर्मवीर आनंद दिघे हायस्कूल, शहापूर येथील ग्रंथालय सभागृहाचे उद्घाटन कंपनीतील महिला कामगार पदाधिकारी, कर्मचारी यांच्या हस्ते करण्यात आले.

येथील विद्यार्थ्यांची शैक्षणिक व गुणवत्ता वाढीसाठी आवश्यक असलेल्या सुसज्ज असे ग्रंथालय येथील इपीएल लिमिटेड या कंपनीच्या माध्यमातून बांधण्यात आले आहे. सदर, विद्यालयात बांधण्यात आलेल्या ग्रंथालयाचे उद्घाटन महिला दिनाचे औचित्य साधून कंपनीतील महिला कामगार पदाधिकारी, कर्मचारी यांच्या हस्ते करण्यांत आले.

यावेळी कंपनीचे जनरल व्यवस्थापक मुरलीधर कीणी, एच.आर. व्यवस्थापक रामदास नायर, उपव्यवस्थापक कमलाकर जाधव, संस्थेचे उपाध्यक्ष शंकरराव खाडे, सचिव काशिनाथ तिवरे, शाळेचे चेअरमन रमेश जगे, मुख्याध्यापक एकनाथ तारमळे, संचालक दत्तात्रय भेरे, कुंडलिक रिकामे, दहागाव उपसरपंच संजय पवार, शिक्षक भारतीचे सुरेश विशे तसेच कंपनीतील महिला कामगार पदाधिकारी, कर्मचारी आदीजण उपस्थित होते.

# भिवंडीत जागतिक महिला दिनानिमित्त जनहिताचे निर्णय

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

झिडके-अंबाडी : भिवंडी तालुक्यातील नांदिठणे येथे जागतिक महिला दिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालयात महिला प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते,यावेळेस सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्ये व भिवंडी तालुका माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ कार्याध्यक्ष शामराव भोईर हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हटले की,महिलांनी समाजात प्रचलित ज्या अनिष्ट परंपरा आहेत,त्या नाकारून विज्ञानवादी विचारांकडे गेले पाहिजे तरच खऱ्या अर्थाने समाजाचे हित साधले जाणार आहे.हे करत असताना अनिष्ट चालीरीती,अंधश्रद्धा,दारूबंदी,हुंडापद्धती, या बाबतीत विरोध करून आपले कुटुंब सक्षम बनविण्यासाठी कटिबद्ध झाले पाहिजे.



तसेच सद्यस्थितीत ग्रामीण भागात एखादी तरूण महिला पतीच्या निधनानंतर विधवा होत असते,त्यावेळेस अशा महिलेच्या अंगावरील आभूषणे काढून,त्या महिलेला अनिष्ट रितीरिवाजानुसार अपमानित व महत्वाच्या शुभ कार्यापासून परावृत्त केले जाते तेव्हा अशा निरपराध महिलेला तिच्या पती निधनानंतर दिली जाणारी तुच्छतेची वागणूक याबाबतीत एक क्रांतीकारक निर्णय घेऊन समाजात परिवर्तन घडविण्याचे काम खऱ्या अर्थाने सुरु होईल,तेव्हाच अशा स्वरूपाच्या कार्यक्रमाची सफलता होईल असेही यावेळेस मार्गदर्शक शामराव भोईर यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले.

सदर कार्यक्रमास सरपंच कुंदा वाघे,उपसरपंच प्रियांका भोईर,ग्रामपंचायत सदस्य,महिला प्रतिनिधी सिमा भोईर, लताबाई भोईर, सविता भोईर अंगणवाडी कार्यकर्त्या उपस्थित होत्या.आदींच्या उपस्थितीत गाव दारूबंदी मुक्त,व महिलांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या अनिष्ट चालीरीती बंद करण्याचा निर्णय तथा ठराव सर्वानुमते यावेळेस घेण्यात आला.याप्रमाणेच संपूर्ण भिवंडी तालुक्यातील ग्रामीण भागात या सामाजिक परिवर्तन बाबतीत अवलंब करणे म्हणजेच सामाजिक प्रगतीचे एक पाऊल पुढे असे म्हणणे वावगे ठरणार नाही.सदर कार्यक्रमात कर्तृत्ववान महिलांचा सत्कारही करण्यात आला,उपस्थितांना चहापान व अल्पोपाहार देण्यात आला.शेवटी या गोड कार्यक्रमाचा शेवट आभार प्रदर्शन उपसरपंच प्रियांका भोईर यांच्याकडून करण्यात आला.

# आगरातील ‘ओजस्विनी’ पुरस्काराने कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /पेण ; अखिल भारतीय आगरी साहित्य संस्था आयोजित महिला दिन विशेष कार्यक्रम खारपाडा येथील हंसाराम बुवा फार्म वर ज्येष्ठ साहित्यिक सुरेश भोपी यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस अमृत पाटील यांनी ईशस्तवन सादर केले.गजानन म्हात्रे यांनी प्रास्ताविक तर अ.भा.स.चे अध्यक्ष कैलास पिंगळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

आगरातील ओजस्विनी या नावाने महिला दिनाचे औचित्य साधून सौ मीनाक्षी तांडेल, सौ संध्या दिवकर,सौ रेखा थळे या कर्तृत्ववान महिलांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.शाल, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.

चंद्रकांत पाटील,अविनाश पाटील, मिनाक्षी तांडेल, संध्या दिवकर,शोभा पाटील,यांनी आपल्या भाषणातून आगरी महिलांचे कर्तृत्व व आगरी संस्कृती या बाबतचे आपले विचार मांडले.आगरी संस्थेद्वारा ११ एप्रिल रोजी भूतानच्या थिंफू राजधानीत आंतरराष्ट्रीय आगरी अस्मिता साहित्य



संमेलन संपन्न होणार असल्याचे संस्थाध्यक्ष कैलास पिंगळे यांनी जाहीर केले.गजानन म्हात्रे हे कार्याध्यक्ष पदावर काम करणार असून,सौ.स्मिताताई वाजेकर यांच्या शुभहस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे अमृत पाटील अध्यक्ष असणार आहेत.संमेलनात आगरी बोली या विषयावर परिसंवाद होणार असून, कविता सादरीकरणा सोबतच अनेकविध पुस्तकांवर साहित्यिक चर्चा होणार आहे

अध्यक्षीय भाषणात ज्येष्ठ साहित्यिक, तथा कवीवर्य सुरेश भोपी यांनी पुरस्कार प्राप्त महिला यांच्यात ओजस्विनी बाणा दिसून आल्याचे सांगून आगरी साहित्यिकांना एकत्र आणण्याचे श्रेय कैलास पिंगळेंना दिले .याचबरोबर मिलिंद खारपाटील यांच्या निर्भिड आणि तत्पर पत्रकारितेचे कौतुक केले.आगरातील ओजस्विनी या महिला दिन विशेष कार्यक्रमात कैलास पिंगळे मिलिंद खारपाटील अरुण धर्माजी पाटील ,सौ.संध्या विजय दिवकर ,सौ.स्मिता वाजेकर चंद्रकांत पाटील ,सुरेश भोपी ,भ पो म्हात्रे ,दिनानाथ पाटील , सौ मिनाक्षी तांडेल, ,अविनाश पाटील, अरविंद पाटील ,गजानन म्हात्रे ,मारुती बागडे ,सौ रेखा चंद्रशोखर ,जी,एच ठाकुर, ,अमृत पाटील अरुण द म्हात्रे,नंदेश गावंड, सौ.तृप्ती नंदेश गावंड,या कवींनी सुरेख अशा कविता सादर करून सर्वांना खुर्चीस खिळवून ठेवले.रेखा चंद्रशेखर थळे यांनी धवळेगीत सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.नंदेश गावंड व तृप्ती नंदेश गावंड या उभयतांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.




‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024